
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 11 | AUGUST - 2018

# " महात्मा फुले यांच्या साहित्यातील कालसापेक्ष विचार "

प्रा. डॉ. अनिता परभतराव खंडागळे
(एम.ए., एम.फिल, बी.एड, पी.एचडी)
मराठी विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय, चिंचोली (लिं,), ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

**प्रास्ताविक :**



इ. स. १८२० ते १८६० हा पन्नास वर्षाचा कालखंड मराठी वाङ्मयाचा काळ "आधुनिक मराठी वाङ्ममयाचा काळ". आधुनिक मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने महत्वाचा काळ ठरतो. इ. स. १८७५ पासून मराठी साहित्याला आधुनिकता प्राप्त झाली. विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे निबंधमालेतील निबंध, हरिभाऊ आपटे यांच्या कथा, कादंबरी, केशवसुतांची कविता किर्लोसकरांची नाटके हे मराठी साहित्याच्या दृष्टीने पहिले आधुनिक साहित्य मानले जाते. आधुनिक साहित्याचे वैशिष्टये म्हणजे या साहित्यात सामाजिक, वर्तमानवास्तवाच्या आणि भौतिक जीवनाच्या जाणिवांचा आविष्कार झालेला असतो.

१९२० पर्यंत आधुनिक साहित्य समृध्द झाले असले तरी बोटावर मोजण्या इतक्याच साहित्यिकांनी साहित्य लेखन केले आहे. पांढरपेशे, बुध्दिजीवी, शहरवासी हया लोकांनी साहित्य लेखन केले होते. साहित्यिक कोणत्याही वर्गाचा, जातीचा वा वर्णाचा असला तरी तो प्रतिभावंत असल्यामुळे त्याची वाङ्मयीन जाणीव ही त्याच्या सर्व समाजापर्यंत पोहचली पाहिजे.

भारत देश हा कृषी प्रधान देश आहे. या देशातील समाजव्यवस्था ही कृषीप्रधान संस्कृतीवर अवलंबून आहे. फुल्यांच्या भाषेत सांगायचे ठरले तर हा देश शूद्राचा आहे. तत्कालीन वर्तमान सामाजिक वास्तव, जीवनप्रश्न, जीवनपध्दती, त्याची आर्थिक परिस्थिती, सांस्कृतीक समस्या, रीतीरिवाज, भाषा यांच्याशी साहित्य हे निगडीत असले पाहिजे. सामाजिक जाणिव यातून व्यक्त झाल्या पहिजे. अशा साहित्याला ग्रामीण साहित्य म्हटले जाऊ लागले. ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, नेमाडपंथी देशी साहित्य, झेपडपट्टीवरील साहित्य, आदिवासींचे, भटक्यांचे साहित्य लेखनाला सुरुवात झाली.

श्री. गं. बा. सरदार महात्मा जोतीराव फुले यांच्या कार्य विषयी 'महात्मा फुले : व्यक्तित्व आणि विचार' या ग्रंथात म्हणतात "महात्मा जोतीराव फुले हे आधुनिक महाराष्ट्रातील मूलगामी समाजपरिवर्तनाच्या चळवळीचे आद्य प्रवर्तक होते. हिंदू समाजातील शूद्रांतिशूद्रांच्या व्यथा त्यांनी नि:शंकपणे बोलून दाखविल्या. कर्जबाजारीपणापायी हैराण झालेल्या शेतकऱ्यांची गऱ्हाणी त्यांनी वेशीवर टांगली. खेडयापाडयांतील या कष्टऱ्यांचे अज्ञान व दरिद्रय हे ईश्वर निर्मित नसून त्याचे मूळ आपल्या समाजव्यवस्थेत आहे. हे त्यांना बरोबर उमगले होते. म्हणून या व्यवस्थेतील धर्माधिष्ठित बौध्दिक गुलामगिरी, सामाजिक अन्याय आणि आर्थिक शोषण याकडे त्यांनी प्रथमच लोकांचे लक्ष वेधले. एकोनाविसाव्या शतकात येथे अनेक विद्यावंत, समाजसुधारक होऊन गेले. जांभेकर, दादोबा पाडुंरंग, राम बाळकृष्ण, लोकहितवादी, भांडरकर, रानडे, विष्णूशास्त्री पंडीत, आगरकर ही नावे सर्वश्रुत आहेत. या सर्वांची दृष्टी उदार व व्यापक होती. तरी देखील त्यांचे कार्यक्षेत्र मर्यादीत राहिले. उच्चवर्णीयांच्या कौटूबिक सुधारणेपलीकडे त्यांच्या कार्याची मजल बहुधा गेली नाही. जोतीरावांच्या कार्याची दिशा याहून अगदी निराळी होती.

ग्रामीण साहित्याच्या दृष्टीने महात्मा जोतीराव फुले यांच्या साहित्याचा कालसापेक्ष दृष्टीने विचार केला तर, शेतकऱ्यांच्या, पददलितांच्या, ग्रामिणांच्या सुख दुःखाचे जीवन केंद्र त्यांच्या वाङ्मयातून प्रकट होते. 'शेतकऱ्यांचा असूड' सारख्या ग्रंथामध्ये आधुनिक दृष्टिकोनातून त्यांची वैचारिक मांडणी त्यांनी केली आहे. ग्रामीण, अडाणी माणूस दैवदैवाला जो दोष देत बसत असे. त्याला सामाजिकतेचे, वर्तमानवास्तवाचे भान फुल्यांच्या साहित्याने दिले आहे.

तत्कालीन - समाजव्यवस्थेत सर्व सामान्य समाजाला कसे स्थान होते. उच्चवर्णियाचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक संबंध कसे आहे. ब्रिटीश सरकार आणि राजकीय दृष्टया संबंध याचे चित्रण 'शेतकऱ्याचा असूड मध्ये फुल्यांनी स्पष्ट पणे मांडले आहे.

फुल्यांनी जे कार्य केले ते साहित्यातून आणि कृतीतून समाजाला दाखवून दिले. मुलींसाठी आणि अस्पृशांसाठी शाळा काढणे, व्हाइसरॉय लॉर्ड लिटनच्या पुणे भेटीच्या वेळी शहर सजावटीसाठी खर्च होणारा पैसा पददलितांच्या शिक्षणासाठी खर्च व्हावा म्हणून खर्चिक शहर सजावटीस विरोध करणे, अस्पृश्यांना आपला पाण्याचा हौद वापरण्यास मुक्त करणे, हंटर शिक्षण आयोगाला पाठविलेले निवेदन,

डयूक ऑफ कॅनौटच्या मजवानीस शेतकऱ्याच्या पोषाखात जाणे. मराठी ग्रंथकारांच्या वेळी त्यांना मिळालेल्या निमंत्रण निमित्त पाठविलेले उत्तर यातून आपल्याला त्यांच्या कार्याची जाणिव, तळमळ व्यक्त होतांना दिसते.

महात्मा फुल्यांनी साहित्य लेखन करतांना लोकजीवन आणि सामान्य माणूस यांचा विचार करुन साहित्य लेखन केले आहे. समाजावर लोकसंस्कृतीचा आणि संत साहित्याचा मोठा प्रभाव आहे, याची फुल्यांना जाणीव होती.

'गुलामगिरी', 'शेतकऱ्याचा आसूड' या सारख्या ग्रंथातून समाजाला वास्तव विचार पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी ग्रामीण भाषेचाच वापर करुन सर्व सामान्य जनतेला जवळ केले. त्यामूळे फुल्यांचे साहित्य हे लोकसाहित्याशी नाते जोडून, आधूनिकतेच्या मार्गाकडे वाटचाल करतांना दिसते. महात्मा फुल्यांच्या साहित्यातून मानवतावाद प्रकट होतो.

रंजले गांजले अनाथा पासावे | प्रीतीने वागावे |
बंधू परी किंवा जगाच्या कल्याना देह कष्टवावा | कारणी लावावा ||

सत्यासाठी यातून संत साहित्याचा प्रभाव फुल्यांच्या साहित्यावर झालेला दिसून येतो. तुकोबा, संत रामदास यांच्या ग्रंथातून जसा दंभस्फोट झाल्याचा जाणवतो तसेच फुलेच्या साहित्यातून प्रकट झाल्याचा दिसून येतो.

वेदबळावर होती धर्मलंड | कुभाडी अभंड |
अनुभवावीन व्यर्थ वाचळता | जळो ती विव्दता ||

"ब्राम्हणाचे कसब" हया सारख्या ग्रंथातून समाजाला वास्तव परिस्थितीची जाणीव करुन देण्यासाठी फुल्यांनी प्रखड भाषेचा वापर केला आहे. फुल्यांच्या साहित्यातून 'शुद्रतिशुद्र' हा शब्द प्रामुख्याने मोठया प्रमाणात दिसून येतो. यातूनच दलितांशी, अस्पृश्यांशी आणि शेतकऱ्यांशी एकरुप झालेले होते. त्यांचा संघर्ष हा मानवतावादासाठी होता.

### बोलीभाषेशी सहसंबंध :

फुलेंचे साहित्य हे बोलीभाषेत लिहिलेले आहे. जेव्हा व्यक्तीला आपले दु:ख व्यक्त करायचे असते. तेव्हा तो आपले दु:ख हे बोली भाषेतच चांगल्या पध्दतीने व्यक्त करु शकतो. म्हणून फुल्यांनी जे साहित्य लेखन केले ते वास्तव मांडणे हा त्यांचा हेतू होता. त्यामुळे त्यांनी भाषेचे तत्व मानण्या पेक्षा भावना व्यक्त कशा होतील याला महत्व दिले आहे.

अंतरीचे धावे | स्वभावे बाहेरी |

अंर्तमनातून ज्या भावना व्यक्त होतात ते खरे साहित्य. फुल्यांनी स्वत:चं मत व्यक्त केले. संकेताच्या आधारे व्याकरणांचे नियम पाळून मनातले दु:ख व्यक्त करता येत नाही.

### प्रदीर्घ रचना :

फुल्यांची शैली बोलीभाषेशी नाते सांगणारी असली तरी दादोबा पाडूंरंग, बाबा पदमनजी, गो. ना. माडगांवकर यांच्या साहित्या प्रमाणे ती छोटया छोटया वाक्याची बनलेली नाही. बोलण्याच्या गतिनूसार लिहित गेल्यामुळे प्रदीर्घ रचना निर्माण झाल्याची दिसते.

विद्येविना मति गेली | मतीविना नीती गेली |
नीतीविना गती गेली | गतीविना वित्त गेले |
वित्तविना शूद्र खचले | इतके अनर्थ एका अविद्येने केले ||

शेतकऱ्याबद्दलची तळमळ फुले किती पोटतिकडीने सांगतात. त्याचा प्रत्यय पुढील उताऱ्यातून स्पष्ट दिसतो.

"अरे, ज्यांच्या श्रमांवर सरकारी फौजफाटा, दारुगोळा, गोऱ्या कामगारांचा वाजवीपेक्षा जास्ती ऐषाराम व काळया कामगारांचे वाजवीपेक्षा जास्ती पगार, पेन्शनी व सोवळचाव असून त्यास चारचौघात पानविडया पुरता मान मिळू नये काय ? अहो, जो सर्व देशातील लोकांचे सुखाचा पाया, त्याचे असे बुरे हाल : त्यास वेळच्यावेळी पोटभर भाकर व अंगभर वस्त्र मिळत नसून ज्याचे उरावर सरकरी पट्टी देण्याची कटार लोंबत आहे. ज्याच्या हालास साहेब लोकांचा शिकारी कुत्रासुध्दा हुंगून पाहिना याला म्हणावे तरी काय ? "

फुलेंचे विचार आज ही किती कालसापेक्ष आहे याचा प्रत्यय येतो. आज ही शेतकऱ्याची परिस्थिती बिकट आहे. शेतकरी हा रात्रंदिवस राबत आहे. निसर्ग साथ देत नाही. डोक्यावर भरमसाठ कर्ज यातूनच तो आत्महत्याचा मार्ग निवडतो.

सार्वजनिक सत्यधर्माला फुल्यांनी महत्वाचे स्थान दिले आहे. सर्व माणसांनी स्वीकारावा असा त्यांचा आग्रह होता. सत्यवर्तन केल्याशिवाय मानव प्राणी जगात सुखी होणार नाही ही त्यांची श्रध्दा होती.

सत्य सर्वाचे आदी घर | सर्व धर्माचे माहेर जगांमाजी सुख सारे |
खास सत्याची ती पोरे सत्य सुखाला आधार |
बाकी सर्व अंध:कार आहे सत्याचा बा जोर | कही भंडाचा तो नीर ||

जोतीरावांनी "अखंड" काव्याची रचना केली ती समाजप्रबोधनासाठी दंभ, ढोग, बुवाबाजी, अंधःश्रध्दा इत्यादी विषयाची चीड यातून व्यक्त होते. जोतीरावांना परमेश्वर, खुळचट धर्मकल्पना, वर्ग व्यवस्था, जातिव्यवस्था नाकारली. हे जोतीरावाच्या अखंड या काव्याच्या अभ्यासातून लक्षात येते. ईश्वराची संकल्पना मांडतांना जोतीरावानी ईश्वरसत्ता नाकारुन फक्त "निर्मिका" ची संकल्पना आपल्या अखंडातूनी मांडली.

सर्वाचा निर्मिक आहे एकधनी | त्याचे भय मनी |
धरा सर्व न्यायाने वस्तूचा उपयोग घ्यावा | आनंद करावा |
भांडू नये धर्मराज्य भेद मानवा नसावे | सत्याने वर्तावे | ईशासाठी ...

जोतीरावांनी स्त्री-पुरुष भेद न मानता, स्त्रिला मानाचे स्थान दिले आहे. सर्वांचा निर्माता एकच मानून मानवतावादाचा पुरस्कार केला आहे.

प्राणीमात्रा सर्व निर्मिली | साधने ती दिली |
परोपरी पदार्थ निर्मून सर्वांस पोशीले | आनंदीत केले |
सर्व काळ त्यापैकी मानव बुध्दिमान केला | सत्य वर्तायाला |
मासल्यात रंजले - गांजले अनाथा पोसावे | प्रीतीने वागावे | बंधुपरी ...

सर्वप्राणी मात्रा मध्ये मानव हा बुध्दीवान आहे. त्यामूळे त्याने सर्वांशी बंधुभावाने वागावे अशी शिकवण ते देतात. स्त्रिला शूद्र मानू नये. उच्चनीचता असा भेद जोतीरावांना मान्य नव्हता.

**समारोप :**

जोतीरावांचे विचार आज ही प्रेरणादायी आहे. ईश्वराची संकल्पना मांडतांना "निर्मिकाला" महत्वाचे स्थान देऊन "निर्मिकालाच" ईश्वर मानले आहे. धर्मासंबंधी विचार मांडतांनी सत्याला महत्व दिले आहे. समाजव्यवस्थे मध्ये स्त्री - पुरुष असा भेद न करता, स्त्रिला शिक्षण दयावे, तसेच शेतकरी वर्गाने ज्ञान घेऊन आपले जीवन समृध्द बनवावे असा त्यांचा व्यापक दृष्टीकोन होता. त्यांनी आपल्या साहित्यातून परखड विचार मांडून चालीरिती, रुढी, परंपरा, अंधश्रध्दा या पासून मानवाने दूर राहावे. समाजात समता, बंधुत्व, प्रेम या तत्वाचा आपण स्विकार करावा असे मत त्यांच्या एकुण साहित्यातून प्रगट होते. फुलेंचा मानवतावाद आज ही महत्वाचा आहे.

**संदर्भ सुची :**

१. महात्मा फुले साहित्य आणि चळवळ - संपा. हरी नरके
२. महात्मा जोतीराव फुले - धनंजय कीर.
३. संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती - गं. बा. सरदार.



**प्रा. डॉ. अनिता परभतराव खंडागळे**
**(एम.ए., एम.फिल, बी.एड, पी.एचडी)**
**मराठी विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय, चिंचोली (लिं,), ता. कन्नड, जि. औरंगाबाद.**